MHST200020392020

# नि.दि.दा.क्र.३२१/२०२३ मधील निशाणी क्र.३४ वरील आदेश

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्रं.१ व २ यांचे असे म्हणणे आहे की, सदर प्रतिवादी यांना कोरोना व्हायरसमुळे विविध शासकीय कार्यालयातुन कागदपत्रे प्राप्त करुन त्याची माहिती वकिलांना देणे शक्य नव्हते. त्यामुळे मुदतीमध्ये कैफियत व म्हणणे तयार करता आले नाही. त्यामुळे दि.०९.१२.२०१९ रोजी त्यांचेविरूद्ध विना कैफियत आदेश पारीत झालेला आहे. सदर प्रतिवादी यांची कैफियत रेकॉर्डवर न घेतलेस त्यांचे कशानेही न भरुन येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

३. वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे देवुन अर्जातील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असल्याचे कथन केले. त्यांनी असे कथन केले की, प्रतिवादी यांनी दिलेल्या विलंबाच्या कारणाचे पृष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. प्रतिवादी यांनी हेतुपुरस्सर कैफियत दाखल करणेस विलंब केलेला आहे. सबब, सदरचा अर्ज रद्द करणेत यावा व मंजुर करावयाचे झालेस खर्च रक्कम रुपये ५०,०००/- आकारणेत यावा अशी त्यांनी विनंती केली.

४. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. सदर दावा स्फेसिफिक परफॉर्मन्स व नुकसान भरपाई मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत प्रतिवादी यांना याच

न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे त्यांना त्यांची कैफियत स्वीकारण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. प्रस्तुत प्रतिवादी क्रं.१ स्वत: व प्रतिवादी क्रं.२ करीता दि.२०.०१.२०२० रोजी हजर झाले आहेत. सदर प्रतिवादींविरुद्ध विना कैफियत आदेश दि.०९.१२.२०१९ रोजी पारीत करणेत आलेला आहे. प्रतिवादी क्रं.१ ने सदरचा अर्ज दि.२५.०८.२०२२ रोजी दिलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं.१ यांना कैफियत देण्यास साधारणपणे २ वर्षे ४ महिन्यांचा विलंब झालेला आहे असे दिसुन येते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

**आदेश**

१) अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी खर्चाची रक्कम रुपये १०००/- (रक्कम रुपये एक हजार फक्त) जमा करावी. त्यापैकी रक्कम रुपये ५००/- सरकार जमा करावी व उर्वरीत रक्कम वादींना दयावी.

३) वरील पुर्तता झाल्यानंतर प्रतिवादी क्रं.१ व २ यांचेविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन त्यांची कैफियत स्विकारण्यात येते.

स्थळ : वाई.
दिनांक : २१.०७.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.